# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ/ महत्वाचे
कालमर्यादीत दिनांक ३१.१२.२०१८.

क्रमांक : १०/एनजीपी/पीसीआय/प्रवेश/२०१८/१४५०
दिनांक : 19 DEC 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता औषधनिर्माणशास्त्र या पदविका अभ्यासक्रमांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांचे मान्यता नसलेल्या संस्थांनी सदर मान्यता ६ महिन्याच्या कालावधीत सादर करणेबाबतचे हमीपत्र सादर केलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० चे प्रवेश प्रक्रीयेतून वगळणेबाबत....

**संदर्भ :** संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/२०१८-१९/६२३, दि.: २२.६.२०१८.

उपरोक्त विषयाबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात आलेले होते की, ज्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास, विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे, विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदतवाढ (EOA) यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता मिळालेली आहे, अशा संस्थांनी संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली असल्यास सदर मान्यता पत्र अथवा मान्यता घेतलेली नसल्यास मान्यता ६ महिन्याच्या कालावधीत सादर करणेबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र संचालनालयास तात्काळ सादर करावे.

त्याअनुषंगाने उपरोक्त विषयांकित मान्यता मिळालेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या काही संस्थांनी संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली नसल्यामुळे मान्यता ६ महिन्याच्या कालावधीत सादर करणेबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले होते. सदर हमीपत्रानूसार ६ महीन्यांची मुदत पुर्ण झालेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली नसल्यामुळे ज्या संस्थांनी सदर मान्यता ६ महिन्याच्या कालावधीत सादर करणेबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे अशा सर्व संस्थांकडून संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली

यांचे मान्यता आदेश सादर करण्याबाबत कळविण्यात यावे. सदर माहिती विभागीय कार्यालय स्तरावर एकत्रित संकलीत करुन सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये एकत्रित करुन फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांचे मान्यता आदेशासह या संचालनालयास दिनांक ३१.१२.२०१८ पर्यंत सादर करण्यात यावी.

तसेच संस्थांकडून परस्पर या संचालनालयास प्राप्त झालेल्या पत्रांबाबत संचालनालयामार्फत विचार केला जाणार नाही व ज्या संस्था शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता संबंधीत कार्यालयामार्फत सादर करणार नाही, अशा संस्थेतील पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाचा समावेश शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही व यास सर्वस्वी संबंधीत संस्था जबाबदार राहील, ही बाब विभागीय कार्यालय स्तरावरुन संबंधीत संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

तसेच ज्या संस्थांच्या प्रवेशक्षमतेचा मा. न्यायालयाच्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेमध्ये समावेश करण्यात आला होता, अशा संस्थांकडून सदर प्रकरणी मा. न्यायालयाच्या नवीनतम (latest) आदेशाची प्रत प्राप्त करुन घेवून आदेशाची खात्री करुन अभिप्राय (Remark) या स्तंभात तसे नमूद करावे.

सोबत : तक्ता जोडण्यात येत आहे.

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.
१. संबंधित सर्व संस्था (संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन),
२. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई, यांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

**Table : Post HSC Diploma in Pharmacy Institute's PCI approval Information**

| SN | DTE Code of Institute | Name of Institute | Sanctioned Intake as per AICTE EoA 2018-19 | PCI approval for/upto Year (2017-18, 2018-19, 2019-20 etc) **(Mention Year)** | Sanctioned Intake as per PCI for/upto Year mentioned in column no. 5 | PCI approval Letter outward Number and Date | Remark (Mention remark if any regarding Court Case etc.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

Name and Signature of Joint Director
Region Name:

Note:

1. Each Instiute shall put DTE Institute code on top right corner of PCI approval Letter and send the copy to respective regional office
2. for Regional Offices: Above Table is to be sorted out as per ascending order of Column 2; The PCI approval letters of all Instiutes shall be arranged accordingly for scanning. All Scanned PCI approvals arranged as per Institute DTE code in single scanned copy and above Table in Excel format is to be sent to desk10@dtemaharashtra.gov.in and by Post as per time limit given in covering letter.